पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०२२ दि.१९/०९/२०१९**

**दत्तवाडी पोलीस ठाणे, पुणे शहर.**

## "गंभीर गुन्हयातील पाहिजे असलेल्या सराईत गुन्हेगारास दत्तवाडी पोलीसांनी केले अटक"

दि. १७/०९/२०१९ रोजी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व पो हवा. ५५२८ फुलपगारे, पो. हवा २५९१ जाधव, पो. ना. ६७४० यादव, पो. शि. १००५९ राऊत, पो. शि. ८१३३ भोसले असे दत्तवाडी पोलीस ठाणे येथे हजर असताना पो. हवा. फुलपगारे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दत्तवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं. २५०/२०१९, भा.द.वि.कलम ३०७, ३२४, १४३, १४७, १४८, १४९, भा.ह.कायदा ३(२५), ४(२५)क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३) सह १३५, मधील पाहीजे आरोपी नामे प्रसाद नरेश गुरव, वय. २३ वर्षे, रा. सर्वे नं. १२६, आंबेडकर वसाहत, दत्तवाडी दर्ग्याजवळ, पुणे हा म्हात्रे पुलाजवळ, पुणे येथे आलेला आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी सदरबाबत पोउनि कुलदिप संकपाळ यांना कळविली असता त्यांनी सदरची बातमी ही वपोनि देविदास घेवारे यांना कळविली त्यावेळी त्यांनी कारवाई बाबत मार्गदर्शन करुन नमुद आरोपीस तात्काळ ताब्यात घेणेबाबत आदेशीत केल्याने त्याप्रमाणे पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व वरील स्टाफ यांनी तत्काळ साध्या वेशात आपापले खाजगी वाहनाने तात्काळ म्हात्रे पुल, पुणे येथे जावुन पाहणी केली असता तेथेच असणारे शामसुंदर सोसायटीचे भिंतीजवळ यातील पाहीजे आरोपी नामे गुरव हा थांबलेला आम्हास दिसला तो रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याने आम्ही सर्वांनी त्यास ओळखले व खात्री झाल्यानंतर आम्ही त्यास वरील स्टाफच्या मदतीने २१/२० वाजता अत्यंत शिताफीने जागीच पकडुन त्याला आहे त्या स्थीतीत ठेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव प्रसाद गुरव, वय. २३ वर्षे, रा. दत्तवाडी पुणे असे असल्याचे सांगीतले त्यावेळी पोलीसांनी त्यास त्याचेवर दाखल असलेले गुन्हयात त्याचे सहभागाबाबत विचारले असता त्याने दाखल गुन्हा केल्याचे कबुल केले असुन असुन गुन्हयाचे तपासातही ते निष्पन्न झाले आहे. म्हणुन पोउनि संकपाळ यांनी त्यास स्टाफच्या मदतीने ताब्यात घेवून त्यास पोलीस ठाणेस आणून त्याठिकाणी त्याला त्याचेवर दाखल असलेल्या गुन्ह्याची माहिती देवुन त्याचे हक्क व आधिकाराची माहिती देवुन दाखल गुन्ह्यात अटक केले आहे.

सदरची कारवाई ही दत्तवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व पो हवा. ५५२८ फुलपगारे, पो. हवा २५९१ जाधव, पो. ना. ६७४० यादव, पो. ना. महेश गाढवे, पो. कॉं. सागर सुतकर, अमित सुर्वे, विकास कदम, अक्षयकुमार वाबळे, शरद राऊत, नवनाथ भोसले यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा के. डी. संकपाळ, पोलीस उपनिरीक्षक, दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे शहर हे करीत आहेत.